# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २९/०३/२०२५ ( शनिवार ) संध्याकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २८/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत विकोली उमरेड येथे पेट्रोलींग केली असता संशयीत वाहन एक पिवळया रंगाचा अशोक लेलॅन्ड कंपनीचा दहा चाकी टिप्पर क्र एम.एच .४० बी.जी ८५६९ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, वाहन चालक **चेतन दिवाकर चचाणे वय ३५ वर्ष, रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर **वाहन सचिन मांडवकर रा. नागपुर** यांच्या मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद वाहन चालकाला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले.

पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती २५,०००/—रूपये आणि २) टिप्पर क्र एम.एच .४० बी.जी. ८५६९ किंमती १८,००,०००/— रूपये असा एकुण **१८,२५,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या **विरूध्द पोस्टे उमरेड** येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) **महाराष्ध्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
# वेलतुर पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन वेलतुर** :—दिनांक २८/०३/२०२५ रोजी वेलतुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की भिवापुर कडुन पचखेडी मार्गे नागपुर कडे कत्तलीसाठी अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **पचखेडी बसस्टॅंड** येथे नाकाबंदी केली संशयीत बोलोरो पिकअप एम. एच. ४० एन. ६५३८ **मिळुन आले वाहन** थांबवुन **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये **२ गोवंश जनावरे** बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आले. सदर वाहनात चालकासह अजुन एक ईसम बसलेला होता. त्यांना त्यांची नाव पत्ते विचारले असता चालक **नितीन सेवकदास घरडे, वय ४५ वर्ष रा. जिवनापुर ता. कुही, जि. नागपुर** आणि त्याचा साथीदार आरोपी नामे **ईश्वर लालाजी देशमुख, वय ३१ वर्षे, रा. भिवापुर ता. कुही जि. नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीतांना जनावर वाहतुक परवाना आणि जनावरे खरेदी पावती याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कागदपत्रे नसल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन एक बोलोरो पिकअप एम एच ४० एन ६५३८ किंमती १,५०,०००/— रूपये. व २ गोवंश जनावरे किंमती २०,००० /— रूपयाचा एकुण किंमती १,७०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

चालक आरोपी नामे **नितीन सेवकदास घरडे, वय ४५ वर्ष रा. जिवनापुर ता. कुही, जि. नागपुर** आणि आरोपी नामे **ईश्वर लालाजी देशमुख, वय ३१ वर्षे, रा. भिवापुर ता. कुही जि. नागपुर** यांच्या विरूध्द कलम ११(१) (ड) प्रा.छ. अधि.,सहकलम ९ महा. प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर